


RNI NO-MAHMAR/2022/90217

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com

Mob- 9822720784




वर्ष ३ रे | अंक : १४६ वा बुधवार दि. १६ जुलै २०२५ पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# एसीबीच्या गळाला टेकाळे नावाचा मासा लागेना!

## अवैध संपत्तीची चौकशी यंत्रणा करेना!










**बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी भ्रष्टाचारातून कमावलेली करोडो रुपयांची शेकडो सातबारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई,अमरावती व बुलडाणा यांच्याकडे देऊनही अद्याप पर्यंत कारवाई संत गतीनेभ्रष्टचारातून कमावलेली करोडो रुपयांची चल - अचल संपत्तीचे शेकडो सातबारे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) ला देऊनही बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांच्यावर कारवाईस संबंधित प्रशासन हतबल का असा प्रश्न जोर धरीत आहे**

**जनसंचलन/बुलढाणा**

महसूल मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे या भ्रष्टाचाऱ्याची पुराव्यानिशी तक्रार दाखल करून त्यांच्या नावे असलेल्या करोडो रुपयांच्या संपत्तीची खूली चौकशी मागील काही महिन्यांपासुन सुरू होऊनही अद्याप पर्यंत मंडळ अधिकारी महाभ्रष्टचारी विजय टेकाळेंवर शासकीय कारवाई करण्यास एवढी दिरंगाई का असा प्रश्न सुज्ञ नागरिकांमध्ये जोर धरीत आहे. करण्याची मागणी एका तक्रारदाराने आता एसीबीला स्मरणपत्र दिले असून कारवाईचा घोडा कुठे अडला? हा प्रश्ननिर्माण झाला आहे.पोलिस उपअधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा व पोलिस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बुलढाणा यांना बुलडाण्याचे मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे, त्यांची पत्नी ज्योती विजय टेकाळे व त्यांचे इतर नातेवाईक यांचे नावे असलेल्या करोडो रुपयाच्या संपत्तीची खुली चौकशी करणेबाबत ६ फेब्रवारी २०२३ व २९ एप्रिल २०२४ रोजी एका तक्रारदाराने तक्रार अर्ज दाखल केले होते. आता ७ जानेवारी २०२५ रोजी स्मरण पत्र देण्यात आले.या तक्रारीत म्हटले आहे की, बुलडाणा येथील मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे, त्यांची पत्नी ज्योती विजय टेकाळे व त्यांचे इतर नातेवाईक यांचे नावे असलेल्या करोडो रुपयाच्या संपत्तीची खुली चौकशी करणे करिता सर्व पुराव्यानिशी यापूर्वीच तक्रार अर्ज सादर केलेले आहेत.मात्र बराच अवधी लोटून गेला असून त्यावर आजपावेतो कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही.आतापर्यंत अर्जावर नियमाप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये आपल्या स्तरावरुन संबंधीतांच्या संपत्तीची चौकशी केली किंवा नाही ? याबाबत तक्रारदाराला कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे हा मासा एसीबीच्या गळाला केव्हा लागेल? आणि भ्रष्टाचार चव्हाट्यावर कधी येईल याकडे अनेकांचे लक्ष केंद्रित आहे.

# राजुर घाटात निसर्गाचा खून!

## बालाजी मंदिराजवळ घाणेरडा कट? मंदिरासमोर ५ पोत्यांमध्ये काय निघाले?

**जनसंचलन/बुलडाणा**

स्वच्छ हवा, डोंगरदऱ्यांचं सौंदर्य, आणि नयनरम्य निसर्ग यामुळे ओळखलं जाणारं बुलडाणा शहर सध्या भयंकर अस्वच्छतेच्या विळख्यात सापडलं आहे. आज सकाळी राजुर घाटातील बालाजी मंदिरासमोर तब्बल ५ पोत्यांमध्ये भरलेले कोमडीचे पंख आणि मांसाचे तुकडे रस्त्याच्या कडेला फेकण्यात आले असल्याचं उघडकीस आलं. या प्रकारामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून, त्यावर माशांचा उपद्रव वाढल्याने आजूबाजूच्या नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पावसाळ्यामुळे यामध्ये अळ्या पडण्याची शक्यता असून त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे.



सकाळी मॉर्निंग वॉक करणारे नागरिक, तसेच पोलिस भरतीची तयारी करणारे युवक-युवती रोज या भागात येत असतात. यांचा आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो. शिवाय, मांसाचा वास जंगलातील हिंस्र प्राण्यांना आकर्षित करून ते शहराच्या दिशेने येण्याची शक्यता नाकारता येत नाही. बुलडाण्याच्या निसर्गमोहक राजुर घाटात असा अमानवी व असंवेदनशील प्रकार घडणं हे अत्यंत निंदनीय आहे. यामागे कोण आहे, हे शोधून त्यांच्यावर तत्काळ कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित प्रशासनाने तात्काळ स्वच्छता करून परिसर निर्जंतुक करावा, अन्यथा संतप्त नागरिक आंदोलनाचा इशारा देत आहेत.

# टॅंक्टर-ऑटो अपघातात एक ठार, एक जण गंभीर

**जनसंचलन/ चिखली**

चिखली-मेहकर मार्गावरील खैरव फाट्याजवळ रविवार, दि. १४ जुलै रोजी रात्री ८ वाजताच्या सुमारास ॲपे आणि टॅंकरमध्ये भीषण अपघात झाला. या अपघातात तालुक्यातील आमखेड येथील मधुकर रामचंद्र वाघ (वय ६२) यांचा जागीच मृत्यू झाला असून, सुनील विष्णू वाघ (वय ३५) हे गंभीर जखमी झाले. प्राप्त माहितीनुसार, चिखली येथून आमखेडकडे परतत असताना (एम. एच. २८-८९७४) क्रमांकाच्या ॲपेने खैरव फाट्याजवळील पेट्रोल पंपासमोर उभ्या असलेल्या (ओडी २३ क्यू ८१५९) क्रमांकाच्या टॅंकरला जोरदार धडक दिली. अपघात इतका भीषण होता की ऑटोत बसलेले मधुकर वाघ व सुनील वाघ हे दोघेही गंभीर जखमी झाले. अपघाताची माहिती मिळताच नातेवाइकांनी दोघांना तत्काळ चिखली येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, तपासणी अंती डॉक्टरांनी मधुकर वाघ यांना मृत घोषित केले. त्यांचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आला आहे. दरम्यान, सुनील वाघ यांच्यावर उपचार सुरू असून, त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. याप्रकरणी मृतकाचे पुतणे संजय वाघ यांच्या फिर्यादीवरून टैंकर चालक हरिशंकर राजेंद्र राय (रा. तेजपुरावा, ता. किशनपूर) याच्याविरुद्ध अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास चिखली पोलिस करीत आहेत

# सोळावं वरीस [लईच] धोक्याचं!

## संपादकीय लेख

वयात येण्याचं वय खरंच खूप धोक्याचं असतं. शरीर मोठं झालेलं असतं. शरीराच्या मागण्या वाढत असतात, वाढलेल्या असतात. मेंदू आतून काय काय करायला सांगत असतो. आणि ते मूल एका वेगळ्याच गुंत्यात अडकलेलं असतं. हा गुंता आहे हे त्या मेंदूला माहीत नसतं. पण त्या गुंत्याचा व्हायचा तो त्रास त्याला होत असतो. आपण मोठे झालो आहोत, आपल्याकडे निर्णयक्षमता आली आहे, ही जाणीव सुखद असते. प्रत्येक जण या प्रकारच्या मनोवस्थेतून गेलेला असतो. लैंगिकता उद्दीपित करणे, हा विषय सध्या खूप ङ्गबघितलाफ जातो. आपल्या हातातल्या मोबाइल नामक यंत्रावर नक्की काय दिसेल, त्यात काय असेल, यावर आपल्या कोणाचंच नियंत्रण नाही. त्यामुळे लहान मुलांपासून मोठ्या माणसापर्यंत सगळ्यांनाच लैंगिकता या विषयाचं ज्ञान विविध प्रकारे मिळतं आहे. मुलं मोठी होत असतात तेव्हा त्यांच्या मेंदूत ङ्गप्री फ्रंटल कोर्टेक्सफ हा अवयव विकसित होत असतो. ङ्गतू आता प्रौढावस्थेकडे जात आहेसफ, असा संदेश हा अवयव देत असतो. याच काळात शरीरात शक्ती येते. नवीनच शिंग फुटलेली असल्यामुळे ङ्गसगळं घरी कशाला सांगायचं?फ असा विचार मुलं करतात. यामुळे त्यांच्यासमोर असलेले गंभीर प्रश्नही ही मुलं मुली कुणाला सांगत नाहीत. विशेषतः लैंगिक प्रश्न ही तर खासच लपवण्याची गोष्ट आहे हे मुलं मुली जाणून असतात. आपल्यासाठी आपलं मूल लहान असतं; पण इतर माणसं त्याच्याकडे / तिच्याकडे लहान म्हणून बघत नाहीत. अशी विकृत माणसं आपल्याही आसपास असू शकतात. आपल्या मुलामुलींच्या आसपास कोण असतं, हे म्हणूनच बघावं लागतं. गेल्या काही दिवसांत / महिन्यांत घडलेल्या काही बातम्यांवर नजर टाकली तर आपल्या समाजाचा एक वेगळा - विकृत चेहरा दिसतो. मुलांच्या मनाला चांगलं वळण लागावं, त्यांच्या हातून कोणत्याही चुका किंवा गुन्हा होऊ नये, याची काळजी आपण घेत असतो. पण इथे तर प्रत्यक्ष शिक्षिकेच्या हातूनच एक गंभीर गुन्हा घडलेला आहे. दहावीत शिकणाऱ्या एका मुलाला या शिक्षिकेने तिच्या एका मित्राच्या मदतीने गटवलं आणि सुमारे वर्षभर फाइव्ह स्टार हॉटेलपासून विविध ठिकाणी नेऊन त्याच्याशी शारीरिक संबंध केले. या संबंधित बातमीमध्ये ङ्गबलात्कारफ असाच शब्द वापरलेला आहे. या एक वर्षाच्या काळात तो दहावीतला मुलगा कोणकोणत्या परिस्थितीतून गेलेला असेल! सुरुवातीला जरी आपल्या बाबतीत नक्की काय घडत आहे हे त्याला समजलं नसेल किंवा या दोघांमध्ये खरं काय घडलं हे आत्ता पूर्णपणे बाहेर आलेलं नाही, ते तपासाअंती बाहेर येईलच. पण जेव्हा त्याच्या लक्षात आलं की इथे आपण पूर्णपणे फसले जात आहोत, तेव्हा त्याने ही गोष्ट घरी सांगितली. मात्र तोपर्यंत एक वर्ष उलटून गेलं होतं. या मुलाने शिक्षिकेला भेटणं थांबवलं, पण शिक्षिकेचा एक कर्मचारी या मुलाच्या घरी निरोप घेऊन गेला. तेव्हा मात्र पालकांनी पोलिसात गुन्हा दाखल केला आणि शिक्षिकेला अटक झाली. इथे गुन्हा शिक्षिकेकडून घडला आहे. दुसऱ्या एका प्रसंगात दहावीतल्या एका मुलीचा गैरफायदा चार जणांनी अनेकदा घेतला. या सर्व काळात तिला किती असह्य झालं असेल! पण ब्लॅकमेल केल्यामुळे तिला धड घरी किंवा अन्य कोणाशी बोलताही आलं नाही. आता याहून जास्त सहन होत नाही हे लक्षात आल्यावर तिने घरच्यांसमोर मन मोकळे केलं. घरच्यांनीही तिला समजून घेऊन, आपण उद्या पोलिसांकडे तक्रार करू, असं सांगितलं. पण त्या आधीच, त्या रात्री या दहावीतल्या मुलीने स्वतःला संपवलं. वर सांगितलेल्या दोन उदाहरणांशिवाय इतर काही लैंगिकतेशी संबंधित भयानक उदाहरणांत आपल्या प्रियकराशी लग्न करायचं होतं म्हणून नवऱ्याचा जीव घेतला... अशाही घटना वारंवार घडत आहेत. या सगळ्याचा सारांश हाच आहे की, वयात येणाऱ्या वयात प्रेम म्हणजे काय, लग्न म्हणजे काय, शारीरिक संबंध म्हणजे काय, याची योग्य माहिती हवी. लैंगिक शिक्षणातल्या काही गोष्टी, जसं की, शरीररचना, प्रजनन, या संदर्भाने होणारे आजार यांची माहिती द्यायला हवी. आणि त्यातली एक महत्वाची गोष्ट म्हणजे एकमेकांशी असलेलं जबाबदारी ओळखणारं समंजस, निरोगी नातं. हे नातं निर्माण करण्यात आपण कमी पडतो आहोत. समाजातली लैंगिकता चुकीच्या पद्धतीने, गुन्हेगारीच्या पद्धतीने बाहेर का पडते आहे? जर मोबाइलवर अनेक गोष्टी विचित्र पद्धतीने घडत असतील, दाखवल्या जात असतील तर या सगळ्या माहितीचं काय करायचं, याचं प्रशिक्षण घ्यायला हवं आहे. यासाठी काही मुद्दे विचारात घ्यायला हवेत.

सर्वप्रथम आपल्या हातातील मोबाइल हे खेळणं नाही, हे समजून घेऊन त्याचा वापर करावा लागेल. या संदर्भातल्या जनजागृतीचा वेग वाढवावा लागेल. थोडाही रिकामा वेळ जर आपल्या हातात असेल आणि आपल्या हाताशी मोबाइल असेल तर तो उगाचच बघत बसणं, ही एक चुकीची, गैर, वाईट, आपल्या मेंदूवर - मनावर दुष्परिणाम करणारी गोष्ट आहे हे स्वतःला निक्षून सांगावं लागेल. मोबाइल हा कामापुरता वापरायचा आहे, हे पुन्हा पुन्हा आपल्या लक्षात येण्याची गरज आहे. आपल्या हे लक्षात असतंच, पण त्याचा अत्यंत मर्यादित वापर हा आपल्यापैकी प्रत्येकाकडून व्हायला हवा. कारण आपल्याला हा मोबाइल न सांगता अनावश्यक माहिती देत असतो. त्यामुळे प्रत्येकाच्या मनावर आणि व्यापक दृष्टीने विचार केला तर समाजमनावर त्याचा परिणाम होत आहे. काही मुलं स्वभावतः अंतर्मुख असतात. अशी मुलं पुस्तकांमध्ये किंवा स्वतःच्या कलांमध्ये, लेखनामध्ये, छंदांमध्ये स्वतःचे मन गुंतवून घेत होती. ती जागाही मोबाइलने घेतलेली दिसते. खरी माणसं, त्यांचे प्रश्न यापासून आपण लांब गेलो आहोत. त्या गोष्टी पुन्हा एकदा आयुष्यात आणायला हव्या आहेत. जागतिक आरोग्य संघटनेने असं सांगितलं आहे, की लहान मुलांच्या हातात जास्त वेळ स्क्रीन दिल्यास त्यांच्या सामाजिक आदान-प्रदानावर आणि पर्यायाने सामाजिक विकासावर दुष्परिणाम होतो आहे आणि तेच आता आपल्याला समाजात दिसत आहे.

# विकसित महाराष्ट्र २०४७; नागरिक सर्वेक्षणामध्ये सहभाग नोंदवा!

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांचे नागरिकांना आवाहन

**जनसंचलन/बुलढाणा**

विकसित महाराष्ट्र २०४७ करिता व्हिजन डॉक्युमेंट तयार करण्यासाठी १५० दिवसाच्या कार्यक्रमाची घोषणा केली आहे. सर्वसामान्य लोकांच्या अपेक्षा, आकांक्षा, विचार व समस्या समजुन घेण्यासाठी नागरिक सर्वेक्षण होणार आहे. या सर्वेक्षणात जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांनी नागरिक सर्वेक्षणात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. विकसित महाराष्ट्रात सहभागी होण्यासाठी https://wa.link/o93s9m या लिंकचा वापर करावा. सर्वेक्षणात राज्यातील सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी शासनाने सर्व विभागांना व प्रशासन यंत्रणेला व्यापक जनजागृती मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या आहेत. यामध्ये ग्रामसेवक, आशा कार्यकर्त्या, अंगणवाडी सेविका, शाळा-महाविद्यालये, स्थानिक केबल नेटवर्क, एफ.एम. रेडिओ, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, बाजारपेठा, गावाच्या वेशीवर फलक, व्हाट्सअॅप ग्रुप, पथनाट्य आणि फिरती प्रचारवाहने आदी माध्यमांचा समावेश आहे. या उपक्रमाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक घटकाचा आवाज शासनापर्यंत पोहोचवणे आणि जिल्हा विकास प्रक्रियेत सर्वांचा सहभाग सुनिश्चित करणे होय. या सर्वेक्षणाद्वारे, नागरिकांना सहभागी होण्यासाठी आणि विकसित महाराष्ट्र २०४७ च्या व्हिजनला आकार देण्यासाठी आमंत्रित करण्यात येत आहे. या सर्वेक्षणात ७ सोपे प्रश्न विचारले आहेत. आपण ऑप्शन्स निवडू शकता, लिहू शकता आणि आवाज रेकॉर्ड करू शकता. शासनाकडून असलेल्या अपेक्षा याबाबत माहिती घेऊन, त्यानुसार रोडमॅप तयार करणे शक्य होणार आहे. त्यामुळे विकसित महाराष्ट्र २०४७ करिता नागरिक https://wa.link/o93s9m या लिंकवर १७ जुलै २०२५ पर्यंत जिल्ह्यातील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आयुष्यमान भारत आणि महात्मा फुले आरोग्य योजनेमुळे वारकऱ्यांचे वाचले प्राण!

**जनसंचलन/बुलडाणा**

आषाढी वारीसाठी नांदेडवरून आलेले ७५ वर्षीय वयोवृद्ध वारकरी बालाजी संगेकर यांना वारी दरम्यान अचानक तीव्र हृदयविकाराचा झटका आला. घटनास्थळीच त्यांची प्रकृती चिंताजनक बनली. तत्काळ प्रतिसाद देत त्यांना डॉ. काने हॉस्पिटल, पंढरपूर येथे दाखल करण्यात आले. वैद्यकीय तपासणीत त्यांची स्थिती अत्यंत गंभीर असल्याचे लक्षात येताच डॉक्टरांनी तातडीने अँजिओप्लास्टी करण्याचा निर्णय घेतला. उपचाराचा खर्च मोठा असूनही, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना यांच्या अंतर्गत सेवेमुळे श्री. संगेकर यांच्यावर पूर्णतः मोफत उपचार करण्यात आले. या योजनेमुळे त्यांच्या कुटुंबावर आर्थिक भार न पडता वेळेवर तातडीची वैद्यकीय मदत मिळाली आणि त्यांचे प्राण वाचले. योजनेविषयी थोडक्यात माहिती: महाराष्ट्र शासनाने सर्वसामान्य नागरिकांसाठी एकत्रित आरोग्य योजना लागू केली आहे, ५ लाख रुपये पर्यंत मोफत उपचाराची सोय, १३५६ आजारांवर मोफत उपचारांचा समावेश, आपत्कालीन परिस्थितीत त्वरित सेवा मिळण्यासाठी सेवा उपलब्ध, राज्यभरात २००० पेक्षा अधिक अंगीकृत खासगी आणि शासकीय रुग्णालयांमध्ये सुविधा उपलब्ध आहे.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# आधी पाऊस पडतो मग हवामान विभागाकडून इशारा; अंदाज हलक्या ते मध्यम सरींचा, मात्र प्रत्यक्षात मुसळधार...

**मुंबई :** मुंबईमध्ये जून आणि जुलै महिन्यात मुसळधार पाऊस न पडल्याने दीड महिन्यामध्ये हवामान विभागाच्या अंदाजावर फारशी टीका झाली नव्हती. मात्र मंगळवारी सकाळपासून पावसाला सुरुवात झाल्यानंतर प्रादेशिक हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट अद्ययावत केल्यामुळे हवामान विभागाच्या अंदाज वर्तवण्यावर टीकेची झोड उठली. सोमवारी वर्तवलेल्या अंदाजानुसार मुंबई आणि महामुंबई परिसरात हलक्या ते मध्यम सरींची शक्यता होती. मात्र दुपारनंतर हा इशारा अचानक ऑरेंज अलर्ट म्हणून अद्ययावत करण्यात आला. सोमवारी रात्री दिलेल्या अंदाजानुसार मंगळवारी सकाळी साडेआठ ते बुधवारी सकाळी साडेआठपर्यंत संपूर्ण कोकण विभागात हलक्या ते मध्यम सरींची शक्यता होती.



मात्र मंगळवारी सकाळपासून मुंबई तसेच नवी मुंबईच्या काही भागांमध्ये पावसाचा जोर वाढला. त्यानंतर दुपारी १२ च्या सुमारास प्रादेशिक हवामान विभागाने ऑरेंज अलर्ट जारी केला.पावसाचा जोर मध्य मुंबईत अधिक होता. कुलाबा केंद्रावर सकाळी साडेआठ ते सायंकाळी साडेपाचपर्यंत चार मिलीमीटर तर सांताक्रूझ केंद्रावर सकाळी साडेआठ ते सायंकाळी साडेपाच पर्यंत ५४ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. प्रादेशिक हवामान विभागाने दुपारी अद्यावत केलेल्या अंदाजानुसार ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये वेगवान वाऱ्यांसह मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला. हा इशारा बुधवारी सकाळी साडेआठ पर्यंत लागू होता.

यामध्ये सांताक्रूझ वगळता रत्नागिरी, डहाणू या केंद्रांवर दिवसभरात फारसा पाऊस नोंदला गेला नाही. अलिबाग येथे दिवसभरात ३८ मिलीमीटर पावसाची नोंद झाली.मुंबईत सध्या नाऊकास्ट म्हणजे पुढील तीन तासांच्या पावसाचा अंदाज अधिक अचूक नोंदवला जात आहे. मात्र हा नाऊकास्टचा अंदाज देऊन लोकांना फारसा फायदा होत नाही. घराबाहेर पडणारी मंडळी नाऊकास्टच्या अंदाजाकडे लक्ष देत नाहीत. ऑरेंज अलर्टसारखा अंदाज आयत्या वेळी दिला की अचानक निर्माण होणारी परिस्थिती लक्षात घेता मुंबईकरांची चिंता अधिक वाढते, अशी प्रतिक्रिया मुंबईकरांमध्ये उमटली. यासोबतच मुंबईकरांना एसएमएसच्या माध्यमातून राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या ई वॉर्निंगमध्ये दुपारी चार वाजताच्या सुमारास मेघगर्जना, विजांचा कडकडाट यासह पावसाची शक्यताही वर्तवण्यात आली होती. त्यामुळे घरी जाणाऱ्या नोकरदार वर्गामध्ये चिंता होती.यासंदर्भात मध्य प्रदेशावरील कमी दाबाचे क्षेत्र तसेच कोकण किनारपट्टीवरील आणि समुद्रातील वाऱ्यांचा वेग वाढल्याने ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आल्याची माहिती मुंबईच्या प्रादेशिक हवामान केंद्राच्या प्रमुख शुभांगी भुते यांनी दिली. घाटमाथ्यावरही पुणे, सातारा येथे ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला. दिवसभरात महाबळेश्वर येथे ६० मिलीमीटर पावसाची नोंद झाली.

# ठाकरेंच्या शिलेदाराची गर्जना! कोकणातील शिवसैनिक मुंबईत प्रचारासाठी उतरणार, खेडमध्ये भाजपला घरघर..

**मुंबई :** आगामी महानगरपालिका निवडणुकीची तयारी राजकीय पक्षांकडून सुरू करण्यात आली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडूनही मुंबईसह ठाणे, कल्याण डोंबिवली, मीरा-भाईंदर या महानगरपालिकांसाठी जोरदार तयारी सुरू झाली आहे. इतकचं नाही तर ठाकरेंचे कोकणातील शिलेदार मुंबईत ठाकरेंच्या प्रचारासाठी उतरणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. याच रणनीतीचा भाग म्हणून रत्नागिरी जिल्हाप्रमुख बाळा खेडेकर यांनी कल्याण पूर्व येथील ठाकरे सेनेच्या संवाद बैठकीत निवडणुकीसाठी तयारीला लागल्याचेच संकेत दिले आहेत. महानगरपालिकेच्या निवडणुकीत ठाकरेंना बळ देण्याचं आवाहन करत मराठीच्या मुद्द्यावरून एकनाथ शिंदे, भाजपवर ठाकरे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी जोरदार टीका केली आहे.एकनाथ शिंदे बाळासाहेबांचे फोटो वापरतात, कारण त्यांच्याकडे स्वतःचे काही नाही. त्यामुळे आपण



आपल्या पक्षावर लक्ष देऊया, असे आवाहन खेडेकर यांनी केले. ते म्हणाले, आगामी निवडणुकीत उद्धव ठाकरेंना साथ द्या. शिंदे गटाचा खेळ चार दिवसांचा आहे. भाजप आपला राजकीय शत्रू आहे. असेही ते म्हणाले. ते पुढे म्हणाले की, मराठी माणूस जेव्हा एक झाला रस्त्यावर उतरला तेव्हा त्यांना कळलं की हा महाराष्ट्र छत्रपतींचा आहे. छत्रपतींचे मावळे सगळ्या धर्मांचे विचारांचे होते. हे भाजपवाले फक्त निवडणुका आल्या की म्हणतात की मुस्लिम आमचे विरोधक आहेत. पण मुस्लिम आपले विरोधक नव्हते साबीर शेख यांच्यासारखे ज्येष्ठ कार्यकर्ते आपल्या पक्षाचे मंत्री होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे जवळचे होते. गुजरातीदेखील आपले दुश्मन नाहीत. पण महाराष्ट्रामध्ये राहून जर का आपल्यावर हिंदी लादत असतील तर ते सहन करू नका. असाही सज्जड इशारा या संवाद बैठकीत देण्यात आला.यावेळी झालेल्या बैठकीला रत्नागिरी जिल्ह्यातील खेड येथील भाजपाचे चंद्रकांत मोरे व रामचंद्र आखाडे हे उपस्थित होते लवकरच या भाजपाच्या दोन्ही पदाधिकाऱ्यांचा प्रवेश उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात होणार आहे. या संवाद बैठकीत चंद्रकांत मोरे यांनी उपस्थिती लावत खेडमधील भाजपावर जोरदार टीका केल्याने खळबळ उडाली आहे. तीन पक्षांचे तीन फोटो म्हणजे भाजपा असं म्हणत आपण या कार्यपद्धतीला कंटाळून आगामी काळात शिवसेनेच्या उद्धव ठाकरे यांनाच साथ देणार अजून लवकरच मोठा पक्षप्रवेश होईल असे जाहीर करून टाकल्याने, रत्नागिरी जिल्ह्यातील खेड तालुक्यातील भाजपही फुटीच्या उंबरठ्यावर असल्याचे स्पष्ट झालं आहे.

# ठाकरेसेनेची बैठक, पण चक्क माजी महापौरांसह नगरसेवकांची दांडी; महापालिकेच्या तोंडावर गेम फिरणार?

**जळगाव :** नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये मोठा पराभव पत्करावा लागल्याने जिल्ह्यातील महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्ये कमालीची निराशा पसरली आहे. गेल्या काही दिवसांत ङ्गमविआफ्तील तब्बल पाच माजी आमदारांनी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला आहे. केवळ आमदारच नव्हे, तर अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनीही भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि अजित पवार गटाची वाट धरल्याने ङ्गमविआफ्ची बांधणी बरीच खिळखिळी झाली आहे.जळगाव महापालिकेसह जिल्ह्यातील नगरपालिकांमधील माजी नगरसेवकांकडूनदेखील भाजपत प्रवेशासाठी चाचपणी सुरू केल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. नुकतीच जळगावात शिवसेना (उबाठा) पक्षाची बैठक पार पडली. या बैठकीला जळगाव महापालिकेच्या माजी महापौरांसह काही माजी नगरसेवकांनी चक्क पाठ फिरवल्याने आता या चर्चांनी जोर धरला आहे. त्यामुळे आगामी काही दिवसांत जळगाव जिल्ह्यात महाविकास आघाडीला खिंडार पडण्याची शक्यता आहे. ही परिस्थिती पाहता, आगामी काळात महाविकास आघाडीसमोर मोठे आव्हान उभे ठाकणार आहे.या पक्षांतरामुळे संघटनात्मकदृष्ट्या कमकुवत झालेल्या महाविकास आघाडीतील घटक पक्षांकडून आता संघटनात्मक बांधणीचे प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रवादी शरद पवार गट, शिवसेना उबाठा व काँग्रेसकडून ङ्गडॅमेज कंट्रोलफ्साठी बैठकांचा सपाटा सुरू आहे. मात्र, अद्याप या पक्षातील पदाधिकाऱ्यांमध्ये हवा तसा उत्साह निर्माण झालेला नाही. भाजपमध्ये लवकरच प्रवेश होणाऱ्यांमध्ये अमळनेरचे माजी आमदार बी. एस. पाटील व यावलचे माजी आमदार अरुण पाटील यांच्या नावांचा समावेश आहे. हे दोन्ही नेते सध्या राष्ट्रवादी शरद पवार गटात आहेत.जिल्ह्यात महाविकास आघाडीतील तब्बल पाच माजी आमदारांनी सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटात प्रवेश केला आहे. केवळ आमदारच नव्हे, तर अनेक प्रमुख पदाधिकाऱ्यांनीही भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि अजित पवार गटाची वाट धरली. त्यापाठोपाठ आता शरद पवार गटातील माजी आमदारदेखील भाजपत प्रवेश करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यामुळे आगामी काही दिवसांत महाविकास आघाडीला मोठा सुरुंग लागण्याची शक्यता आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# उद्धवजींसोबत जाऊया, मनसे नेत्यांचा सूर, तरी राज ठाकरेंचं वेट अँड वॉच का? अखेर उत्तर मिळालं

**नाशिक :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या इगतपुरी येथे सुरू असलेल्या अधिवेशनात अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यभरातून बोलाविलेल्या १२० पदाधिकाऱ्यांपैकी बहुसंख्य पदाधिकाऱ्यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षासोबत युती करण्याच्या बाजूने कौल असल्याची माहिती सूत्रांनी दिली. पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या प्रश्नोत्तराच्या तासात अनेकांनी शिवसेना ठाकरे गटासोबत युती करावी, असे मत मांडले. परंतु, तुमच्या मनासारखं करू, पण थोडे थांबा,फ असा सबुरीचा सल्ला राज ठाकरेंनी दिल्याचे समजते. तसेच आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मराठीचा मुद्दा आणि मतदारयादीवर लक्ष ठेवून निवडणुकीची तयारी करण्याचे धडेही ठाकरे यांनी बैठकीत दिले.



मराठीच्या मुद्द्यावरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे विजयी मेळाव्यात एकत्र आल्यानंतर दोन्ही पक्षांच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी युती करण्याचा दबाव वाढवला आहे. या पार्श्वभूमीवर राज ठाकरे यांनी युतीबाबत मंथन करण्यासाठी इगतपुरीत राज्यातील निवडक १२० पदाधिकाऱ्यांसोबत सोमवारपासून एका पंचतारांकित हॉटेलमध्ये बंद दाराआड चर्चा सुरू केली आहे.मुंबईतील सर्व विभागीय अध्यक्ष, ठाणे, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूरसह राज्यातील पदाधिकाऱ्यांशी राज ठाकरे यांनी मंगळवारी प्रश्नोत्तराचा तास घेतला. तुम्हाला प्रत्यक्ष कामकाज करताना फिल्डफ्वर काय अडचणी येतात, आगामी पालिका निवडणुका लक्षात घेऊन मराठी व मतदारयादीमधील गोंधळाचा मुद्दा लक्षात ठेवून कशा पद्धतीने कामकाज करायचे, याबाबतचे धडे राज यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.

या बैठकीत पदाधिकाऱ्यांना थेट प्रश्न विचारण्याचीही संधी दिली. त्यावेळी पदाधिकाऱ्यांनीही शिवसेना ठाकरे गटासोबतच्या युतीबाबत प्रश्न विचारले. बहुसंख्य पदाधिकाऱ्यांचा कौल पाहता ठाकरेंनीही पदाधिकाऱ्यांना नाराज न करता, युतीबाबतचा निर्णय माझ्यावर सोडा, तुमच्या मनासारखे करण्याचा प्रयत्न करू. परंतु, त्यासाठी थोडंसं वेट अँड वॉचफ करा,फ असा सबुरीचा सल्ला देत, युतीबाबतचे दार अप्रत्यक्षपणे खुले ठेवले आहे.आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेता मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण, डोंबिवली, नाशिक, छत्रपती संभाजीनगर या महापालिकांमध्ये निवडणुकांची कशी तयारी करायची याबाबत मार्गदर्शन केल्याचे समजते.मनसे, उबाठाफ्च्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांना युती हवी असून ती नेत्यांनाही पटले आहे. परंतु, एवढ्या घाईत युतीचा निर्णय घेणे धोक्याचे असल्याने तसेच निवडणुका डिसेंबरनंतर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महायुतीकडून दगाफटका होण्याची भीती ठाकरे बंधूंना आहे. त्यामुळे युतीबाबत आस्तेकदममची भूमिका ठाकरेंनी घेतल्याचा दावा पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यामुळे आगामी काळात युतीबाबत पोषक वातावरण तयार केले जाणार असून, दिवाळीनंतरच सगळी प्रक्रिया होईल, असा दावाही पदाधिकारी नाव न सांगण्याच्या अटीवर करीत आहेत.


## जर सरकार आपली कामं करत नाही, तर आपण त्याचे प्रश्न का नाही विचारायचे? तेजस्विनी पंडितचा जनतेला सवाल...

**मुंबई -** तेजस्विनी पंडित ही आघाडीची मराठी अभिनेत्री असून लवकरच ती ये रे ये रे पैसा ३ या सिनेमामध्ये झळकणार आहे. तेजस्विनी सोशल मीडियावर सक्रीय असते आणि त्याद्वारे सामाजिक, राजकीय घडामोडींवर मत व्यक्त करते. अशातच २०२३ मध्ये तेजस्विनीने टोलदरवाढीवर तत्कालीन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा व्हिडिओ शेअर करत ट्विट केलं होतं. हे ट्विट शेअर करत तिनं, राजसाहेब तुम्हीच आता काय ते करा, महाराष्ट्राला वाचवा ह्या टोल धाडीतून!! असं लिहिलं होतं. अभिनेत्रीला या ट्विटमुळे ट्रोल करण्यात आलेलं, तर काहींनी तिला पाठिंबा दिलेला. अशातच एका मुलाखतीदरम्यान तेजस्वनींनं याबद्दल भाष्य केलं आहे. लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीदरम्यान तेजस्विनीला त्या ट्विटबद्दल विचारण्यात आलं. त्यावर तेजस्विनी पंडित म्हणालेली की, उद्या काय, उद्या सत्तेत कोणीही बसो, मला फरक नाही पडत त्याने. पण सत्तेत बसल्यानंतर तुम्ही जर का चुकत , तुम्ही लोकांना ग्रांटेड घेत असाल. नॉर्मल पब्लिक म्हणून तुम्ही आम्हाला डावललंत तर जनता म्हणून मी बोलणारच आहे आणि ते मी बोललंच पाहिजे, कारण मी व्होट करते आहे. मी मतदान केल्यावर, मला प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि जेवढी माणसं मतदान करतायत, त्यांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे. तर तुम्ही का नाही विचारात? जर का सरकार आपली कामं करत



नाही, तर आपण त्याचे प्रश्न का नाही विचारायचे? आणि माझं म्हणणं आहे की, जेव्हा एक खूप मोठी व्यक्ती उपमुख्यमंत्री ज्यांच्याबद्दल आपण म्हणतोय की, तुम्ही अत्यंत जबाबदारी व्यक्ती आहात, तुमच्यावर जबाबदारी आहे.जबाबदार व्यक्तिमत्व तुम्ही जर का आहात, तर तुम्हाला कुठला मुद्दा मांडायचा आहे, तर त्याच्यात स्पष्टता असली पाहिजे. तुम्हाला काय म्हणायचंय ही, स्पष्टता असली पाहिजे. ती स्पष्टता जर का नसेल, तर मला चिटेड फीलिंग्स येणारच आहे. मग मी प्रश्न विचारणारच आहे, मग ते का झोंबतंय? आणि मी ट्रोलर्सच्या भानगडीत कधी पडत नाही, मला त्याचा काही फरक पडत नाही. कारण माझ्यासाठी जे चूक आहे, ते समोरच्यासाठी बरोबर असू शकतं किंवा उलट पण. त्यामुळे मी जे बोलले ते काही लोकांना आवडणार नाही, काही लोकांना आवडणार. त्यामुळे काहींना आवडलं त्यांनी पुश केलं आणि ज्यांना नाही आवडलं त्यांनी मला दाबण्याचा प्रयत्न केला. असं तेजस्विनी पुढे म्हणालेली.

## किआरा सिद्धार्थच्या घरी चिमुकल्या परीचं आगमन, चाहत्यांकडून शुभेच्छांचा वर्षाव...



किआरा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी आहे. ते दोघे आता आई-वडील झाले आहेत. किआरा अडवाणीने एका गोंडस मुलीला जन्म दिला आहे, . ही बातमी ऐकून दोघांच्याही घरात आनंदाचं वातावरण आहे. सोशल मीडियावर त्यांचे चाहते सेलिब्रिटी कपलवर शुभेच्छांचा वर्षा करत आहेत.किआरा आणि सिद्धार्थच्या घरी लक्ष्मी आली आहे. किआरा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांनी २०२३ मध्ये लग्न केलं. यावर्षीच्या सुरुवातीला किआराने ती गरोदर असल्याची बातमी दिली होती. आता तिने एका मुलीला जन्म देऊन चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. हिंदुस्तान टाइम्सच्या रिपोर्टनुसार, किआराची नॉर्मल डिलीवरी मुंबईच्या रिलायन्स हॉस्पिटलमध्ये झाली.चाहते किआरा आणि सिद्धार्थवर खूप प्रेम व्यक्त करत आहेत. एका युजरने कमेंटमध्ये लिहिलं आहे, ङ्गतुम्हा दोघांना खूप खूप शुभेच्छा. तर दुसऱ्याने लिहिलं आहे, वाह! घरी लक्ष्मी आली आहे.किआरा अडवाणी आणि सिद्धार्थ मल्होत्रा यांची लव्ह स्टोरी खूप इंटरेस्टिंग आहे. ते दोघे पहिल्यांदा एका पार्टीत भेटले होते. त्यानंतर त्यांची मैत्री झाली आणि मग ते एकमेकांच्या प्रेमात पडले. २०२३ मध्ये त्यांनी राजस्थानमध्ये शाही अंदाजात लग्न केलं. किआरा आणि सिद्धार्थने शेरशाह सिनेमात एकत्र काम केले होते. त्यांची केमिस्ट्री लोकांना खूप आवडली होती. किआरा लवकरच वॉर २ सिनेमात दिसणार आहे. तर सिद्धार्थ मल्होत्राचा परम सुंदरी सिनेमा लवकरच प्रदर्शित होणार आहे.सिनेमांमध्ये काम करण्यासोबतच, किआरा आणि सिद्धार्थ त्यांच्या पर्सनल लाईफमुळेही चर्चेत असतात. अनेकांचे सिद्धार्थ आणि किआरा आवडते सेलिब्रिटी कपल आहे. आता ते आई-वडील झाल्यामुळे त्यांच्या चाहत्यांना खूप आनंद झाला आहे. बाळ झाल्यानंतर किआरा आणि सिद्धार्थ त्यांच्या कामातून ब्रेक घेणार आहेत. ते आपल्या बाळासोबत वेळ घालवणार आहेत. त्यांचे चाहते त्यांच्या बाळाची पहिली झलक पाहण्यासाठी खूप उत्सुक आहेत.किआरा आणि सिद्धार्थने त्यांच्या नात्याला खूप जपलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# सह्याद्रीच्या पर्वतरांगामध्ये तुफान पाऊस, महाड-पोलादपूरला पूरपरिस्थिती, मुसळधार पावसानं कोकणला झोडपलं...



**रायगड :** कोकणात मे महिन्याच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू झालेल्या अवकाळी पावसामुळे पाणीटंचाई नसली, तरी नद्या दुथडी भरून वाहत आहेत. जुलै महिन्यात सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये जोरदार पाऊस झाल्यानं महाडमध्ये पूरस्थिती निर्माण झाली आहे. शहरात पाणी शिरण्यास सुरुवात झाली आहे. सततच्या पावसामुळे शेतकरी आणि आदिवासी समाजाला फटका बसला आहे. भात पिकाची पेरणी उशिरा झाली आहे. महाड आणि पोलादपूर तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. रत्नागिरी, सातारा आणि पुणे जिल्ह्याच्या सीमेवरील डोंगराळ भागातून येणारं पाणी सावित्री, काळ, गांधारी, नागेश्वरी आणि मल्लिकार्जुन नद्यांद्वारे खाडीत जात आहे. खाडीला भरती आल्याने नदीच्या पात्रात फुगवटा निर्माण होऊन महाड शहरात पाणी भरत आहे. कोकणात ढगफुटी सदृश पाऊस झाला. त्यामुळे पोलादपूर शहरात सावित्री नदीचं पाणी शिरलं. महाड तालुक्यातील फाळकेवाडी परिसरातही जोरदार पाऊस झाला. रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याला जोडणारे रस्ते काही वेळासाठी बंद झाले होते. महाड शहरात सकाळपासूनच पाणी भरायला सुरुवात झाली आहे.महाड आणि पोलादपूरमध्ये दरवर्षी सरासरी २,५०० मि.मी. पाऊस पडतो. यावर्षी मे महिन्यापासून १,५०० मि.मी. पाऊस पडला आहे. अजून १,००० मि.मी. पाऊस पडण्याची शक्यता आहे. इ्ङ्घसन २०२१ सारखी पूरपरिस्थिती यावर्षी नसेल, तरी समुद्राच्या भरती आणि डोंगराळ भागातील पावसाच्या पाण्यावर महाड आणि पोलादपूरमधील पूरस्थिती अवलंबून आहे,इ्ङ्घ असा अंदाज जाणकारांनी व्यक्त केला आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्येही तीन दिवसांपासून संततधार सुरू आहे. संगमेश्वर, देवरुख, साखरपा, लांजा, राजापूरमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून, रस्ते वाहतुकीला फटका बसला. मुंबई-गोवा महामार्गावर संगमेश्वर येथे डोंगराचा भाग महामार्गावर वारंवार येत असल्याने वाहनांना अडथळा पार करत सिंधुदुर्गकडे जाण्यासाठी कसरत करावी लागत आहे. संगमेश्वर बाजारपेठेमध्ये पाणी शिरल्याने रामपेठमधील काही दुकाने पाण्याखाली गेली. संगमेश्वर-देवरुख मार्गावरील वाहतूक काही वेळ बंद ठेवावी लागली. संगमेश्वर खाडीपट्ट्यात पावसाचा जोर प्रचंड असून, डिंगणी मार्ग पाण्याने वेढल्याने वाहतूक विस्कळीत झाली.


## रुग्णालयाबाहेरच रुग्णवाहिका चालकांमध्ये बाचाबाची, तीन तास बॉडी तशीच पडून राहिली...




**कल्याण :** कल्याणमध्ये एका मजुराच्या मृतदेहासाठी रुग्णवाहिका चालकांनी जास्त भाडे मागितले. त्यामुळे तीन तास वाद झाला. गरीब नातेवाईकांना मृतदेह तेलंगणाला नेण्यासाठी खूप त्रास झाला. याआधीही याच रुग्णालयात भाड्यामुळे एका महिलेचा मृत्यू झाला होता.कल्याणच्या रुक्मिणीबाई रुग्णालयात ही घटना घडली. करिया बिच्चप्पा नावाच्या मजुराचा इमारतीवरून पडून मृत्यू झाला. त्याचे शवविच्छेदन रुक्मिणीबाई रुग्णालयात झाले. त्याचा मृतदेह तेलंगणाला त्याच्या गावी न्यायचा होता. करियाला तीन मुली आहेत आणि त्याची आर्थिक परिस्थिती खूपच खराब आहे. करीयाच्या मित्रांनी आणि नातेवाईकांनी पैसे जमा केले. त्यांनी एका खाजगी रुग्णवाहिका चालकाशी बोलणी केली. रोशन शेख नावाच्या चालकाने २५ हजार रुपये भाडे सांगितले. नातेवाईकांनी भाडे कमी करायला सांगितले, पण तो तयार नव्हता.समीर मेमन नावाचा दुसरा चालक १५ हजार रुपयांमध्ये तेलंगणाला मृतदेह घेऊन जायला तयार झाला. तेव्हा रोशन शेखने त्याला विरोध केला. त्यामुळे दोघांमध्ये वाद झाला आणि तीन तास मृतदेह शवागृहात पडून राहिला. समीर मेमन म्हणाला, मी करियाच्या घरच्यांची परिस्थिती पाहून १५ हजारात तयार झालो. पण दुसरा रुग्णवाहिका चालक युनियनच्या नावाखाली दादागिरी करतो. हॉस्पिटलमध्ये कोणतीही युनियन नाही. अशा प्रकारे दादागिरी सुरु असते. रोशन शेख म्हणाला, २५ हजार भाडे सांगितले होते. ७०० किलोमीटर आहे. आम्हाला कमी भाडे परवडत नव्हते. आम्ही कोणत्याही चालकाला अडवले नाही.या घटनेमुळे रुग्णवाहिका चालकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. रुक्मीणीबाई रुग्णालयात खाजगी आणि सरकारी रुग्णवाहिका चालकांची मुजोरी ही काही नवी बाब नाही. रुक्मिणीबाई रुग्णालयात खाजगी आणि सरकारी रुग्णवाहिका चालकांची मनमानी नेहमीच असते. त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. गोरगरीबांना लूटण्याचे काम रुक्मीणीबाई रुग्णालयाच्या बाहेर सुरु असते. केडीएमसी प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे, असा सवाल विचारला जात आहे. याआधीही भाडे आकारणीवरून रुग्णवाहिका चालकांची दादागिरी समोर आली आहे.

## बसमध्ये चढताना महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी चोरीला, तर कॅनरा बँकेतही चोरीचा प्रयत्न फसला, पुण्यातील घटना

**पुणे :** हडपसरमधील मांजरी खुर्द परिसरातील कॅनरा बँकेच्या शाखेत रविवारी मध्यरात्री चोरीचा प्रयत्न उघडकीस आला. चोरट्यांनी बँकेत घुसून तिजोरी फोडण्याचा प्रयत्न केला. मात्र, तिजोरी न उघडल्याने कागदपत्रे अस्ताव्यस्त करून ते पसार झाले. या प्रकरणी वाघोली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत बँक व्यवस्थापकांनी पोलीस तक्रार दिली आहे. या घटनेने मोठी खळबळ उडालीये.बँक व्यवस्थापक शुभम ब्रजकिशोर शर्मा (वय ३७) यांनी वाघोली पोलिसांकडे तक्रार दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कॅनरा बँकेचे कार्यालय मांजरी खुर्दमधील एका इमारतीच्या तळमजल्यावर आहे. चोरट्यांनी रात्री बँकेच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी तिजोरी उघडण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यात अपयश आल्याने बँकेतील कागदपत्रे अस्ताव्यस्त केली आणि तेथून फरार झाले. या घटनेनंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.,सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा शोध सुरू आहे. बँकेतील सीसीटीव्हीमध्ये आरोपी हे स्पष्ट दिसत आहेत, असे सांगितले जातंय. तुळशीबाग परिसरात गर्दीचा फायदा घेऊन एका महिलेच्या पर्समधून चोरट्यांनी दागिने आणि रोकड असा ३८ हजार ५०० रुपयांचा ऐवज लांबविल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी विश्रामबाग पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.




तक्रारदार महिला हडपसरमधील मांजरी परिसरातील रहिवासी असून, त्या कुटुंबीयांसह तुळशीबागेत खरेदीसाठी आल्या होत्या. सायंकाळच्या सुमारास गणपती मंदिरासमोर गर्दीत असताना त्यांच्या खांद्यावर असलेली छोटी पर्स चोरट्याने लंपास केली. पर्समध्ये सोन्याचे दागिने आणि रोकड असा एकूण ३८ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल होता. स्वारगेट पीएमपी स्थानक परिसरात बसमध्ये चढताना ७४ वर्षीय महिलेच्या हातातील सुमारे ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची बांगडी अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी स्वारगेट पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार महिला या नाशिक जिल्ह्यातील असून १२ जुलैला सायंकाळच्या सुमारास त्या स्वारगेट स्थानकातून वाकडेवाडीकडे जाण्यासाठी पीएमपी बसमध्ये चढत होत्या. गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने कटरच्या साह्याने त्यांच्या हातातील सोन्याची बांगडी कापून पळ काढला.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मी तुमच्यावर खूप प्रेम करतो आई-बाबा, पण बस नागपुरात नीटच्या विद्यार्थ्याने आयुष्य संपवलं

**नागपूर:** सॉरी मम्मी पापाजी... मी नाही करू शकणार हे शब्द वाचून कोणाच्याही काळजाला चीर पडावी अशी अवस्था होते. नागपूरच्या अंबाझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडलेली ही घटना संपूर्ण शहराला आणि राज्यभरातील पालकांना हादरवून गेली आहे. शिक्षणाच्या प्रचंड स्पर्धेत आणि पालकांच्या अवास्तव अपेक्षांच्या ओझ्याखाली दबलेल्या अनेक विद्यार्थ्यांची ही एक वेदनादायी कहाणी ठरते आहे.१६ वर्षीय एक विद्यार्थी नागपूरच्या कॅनॉल रोडवरील ङफिजिक्सवाला विद्यापीठफ कोचिंग क्लासेसमध्ये शिकत होता. त्याचा पालकांनी बालाघाटहून नागपूरला वैद्यकीय प्रवेशासाठी () ची तयारी करण्यासाठी पाठवले होते. तो हिलटॉप परिसरातील हॉस्टेलवाला या वसतिगृहात राहत होता. सोमवारी या विद्यार्थ्याने आपल्या




वसतिगृहातील खोलीत पंख्याला गळफास घेऊन आयुष्य संपवलं. ही हृदयद्रावक घटना विद्यार्थ्यांवर असलेल्या मानसिक दबावाचे आणि पालकांच्या अपेक्षांच्या ओझ्याचे भीषण वास्तव पुन्हा एकदा उघड करत आहे.मृत्यूपूर्वी या विद्यार्थ्याने आपल्या आई-वडिलांसाठी एक सुसाईड नोट लिहिली होती. ती वाचताना कोणाच्याही डोळ्यात पाणी येईल. त्याने लिहिलं की, ङ्ख सॉरी मम्मी पापाजी, नाही करू शकणार मी दीड आठवड्यापासून वाटत होतं की मी नाही करू शकणार सॉरी आणि धन्यवाद मला प्रत्येक गोष्ट वेळेवर दिल्याबद्दल मी तुमच्यावर खूप प्रेम करतो आई-बाबा पण बस आता नाही जमणार माझ्याकडून बायफ्फ या चिठ्ठीत त्याने हेही लिहिले की, तो आई-बाबांना भेटायला खूप इच्छित होता. पण, आता शक्य नाही आणि त्यांना रडू नको असेही म्हटले. ङ्खमी हे सगळं स्वतःच्या इच्छेने करत आहे,फ्फ असे त्याने स्पष्ट केले होते. या शब्दांतून त्याच्या एकटेपणाचा, मानसिक थकव्याचा आणि निराशेचा प्रत्यय येतो.ही कहाणी या एकट्या विद्यार्थ्याची नाही, तर आजच्या काळात शिकणाऱ्या हजारो तरुणांच्या मनात चाललेल्या घुसमटीचं प्रतीक आहे. जीव देण्याच्या काहीच मिनिटांपूर्वी त्याने आपल्या मित्रांसोबत मेसमध्ये जेवण केले होते. कुणालाही कल्पना नव्हती की, तो जेवण केल्यानंतर असं काही करणार आहे. दुपारी ११ वाजता तो खोलीत गेला आणि आतून दार बंद केलं.

बऱ्याच वेळापर्यंत त्याने दार उघडलं नाही, तेव्हा मित्रांनी दार तोडून आत प्रवेश केला. समोरचं दृश्य पाहून सगळ्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. संपूर्ण वसतिगृह दुःखाने, सुस्काऱ्यांनी आणि रडण्याच्या आवाजाने हादरलं होतं. अशी अनेक मुलं आज पालकांच्या स्वप्नांची, अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी प्रचंड दबावात जगत आहेत. ही घटना प्रत्येक पालकासाठी एक मोठा इशारा आहे. आपल्या मुलांचं मानसिक आरोग्य, त्यांचं भावनिक स्वास्थ्य आणि ते कितपत स्पर्धेला सामोरं जाऊ शकतात, यावर गांभीर्याने विचार करणं आता अत्यंत आवश्यक झालं आहे. प्रत्येक मुलाला स्पर्धेत उतरवणं गरजेचं नाही; त्यांच्या क्षमतांचा आणि मर्यादांचा सन्मान करणे हे पालकांचं आद्य कर्तव्य आहे. या दुर्दैवी घटनेने पुन्हा एकदा दाखवून दिलं आहे की, शैक्षणिक यशाच्या शर्यतीपेक्षा मुलांचे मानसिक आणि भावनिक आरोग्य किती महत्त्वाचं आहे. ही घटना केवळ एक बातमी नाही, तर हजारो ङ्खख्वाहिशफ नावाच्या मुलांच्या मनात चाललेल्या त्रासाची हाक आहे. या हाकेला वेळेत ओ देणं, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

# आजपासून भारत आणि इंग्लंडच्या वनडे मालिकेला सुरुवात...

नुकत्याच आटोपलेल्या टी-२० मालिकेत यजमान इंग्लंडला लोळवल्यानंतर भारतीय महिला क्रिकेट संघ आज, बुधवारपासून रंगणाऱ्या वनडे मालिकेला सामोरा जाणार आहे. इंग्लंडविरुद्धची ही मालिका तीन वनडेंची असेल. हरमनप्रीतच्या संघाने टी-२० मालिका ३-२ अशी जिंकली. मालिकेतील पहिली वनडे साऊदम्पटन येथे होईल. वनडे मालिकेतील सामने भारतीय वेळेनुसार संध्याकाळी ५.३० वाजता सुरु होतील.यंदा मे महिन्यात झालेल्या तिरंगी वनडे स्पर्धेत भारताने विजय मिळवला होता. एकूणच बुलंद आत्मविश्वासासह महिला संघ या मालिकेस सुरुवात करेल. गेल्या काही वर्षांत भारतीय संघाने विशिष्ट नियोजनासह वाटचाल सुरू केली आहे. प्रथम फलंदाजीची संधी मिळाल्यास तिनशेच्या टप्प्यातील धावांचे आव्हान उभारायचे अन् आश्वासक गोलंदाजीसह सरशी साधायची! मे महिन्यातील तिरंगी मालिकेतही भारताने २७६, २७५, ३३७ आणि ३४२ धावा तडकावल्या होत्या. या डावपेचांची पार्श्वभूमी कर्णधार हरमनप्रीतने सांगितली. ङ्खतिनशे किंवा त्यापेक्षा जास्तच धावांचा निर्धार करून आम्ही फलंदाजीस येतो. त्यात यश मिळाल्यास गोलंदाजांवरील ताण हलका होता. पूर्वी आम्ही पाच गोलंदाज घेऊन खेळायचो. अशावेळी मोठ्या धावांचे लक्ष्य उभारताना किंवा पाठलाग करताना अडचणी यायच्याफ, याकडे हरमनप्रीत कौरने लक्ष वेधले.

तिरंगी मालिकेत चमक दाखवणाऱ्या प्रतिका रावल हिला यावेळीही सलामीची फलंदाज शेफाली वर्माऐवजी प्राधान्य देण्यात आले आहे. महिलांच्या आंतरराष्ट्रीय वनडे क्रिकेटमध्ये झटपट पाचशे धावांचा पल्ला गाठणारी ती पहिली फलंदाज ठरली. तिच्यासह कर्णधार हरमनप्रीत कौर, उपकर्णधार स्मृती मानधना, ङ्खफिनिशरफ रिचा घोष, भरवशाची फलंदाज जेमिमा रॉड्रिग्ज आणि हर्लीन देओल असे आघाडी आणि मधल्या फळीतील पर्याय भारताकडे आहेत. दीप्ती शर्मा आणि अमनजोत कौर तळाला उपयुक्त फटकेबाजी करू शकतात.

तितासा साधू, रेणुका सिंग आणि पूजा वस्त्रकार या आघाडीच्या गोलंदाजांच्या अनुपस्थितीत गोलंदाजांची कसोटी लागणार आहे. अशावेळी अरुंधती रेड्डी, क्रांती गौड आणि अमनजोत कौर आणि सायली गणेश यांच्यावर जबाबदारी असेल. फिरकी गोलंदाजांमध्ये भारतीय संघ अधिक उजवा आहे. श्रीचारिणी, राधा यादव या डावखुऱ्या फिरकी गोलंदाजांसह ऑफस्पिनर स्नेह राणा आणि दीप्ती शर्मा यांच्याकडून हमखास कामगिरीची अपेक्षा करता येऊ शकते.

दरम्यान कर्णधार नॅट शायव्हर-ब्रंट हिच्या पुनरागमनाने इंग्लंडची ताकद दुणावली आहे. दुखापतीमुळे ती टी-२० मालिकेला मुकली होती.

# बीसीसीआयच्या दबावामुळे विराट-रोहित कसोटीतून निवृत्त? खरं कारण अखेर आलं समोर...

मुंबई: भारतीय क्रिकेट संघातील दोन अनुभवी खेळाडू रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी इंग्लंड दौऱ्यापूर्वी कसोटीतून निवृत्तीची घोषणा केली. रोहितने इंस्टाग्रामवर एक स्टोरी शेअर केली आणि त्याबद्दल माहिती दिली तर चिकूने एक पोस्ट लिहिली. दोन्ही खेळाडूंनी ऑस्ट्रेलियात बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये त्यांचा शेवटचा कसोटी सामना खेळला. आता खेळाडूंनी आपल्या इच्छेने निवृत्ती घेतली की बीसीसीआयच्या दबावाखाली निवृत्ती घेतली यावर मोठे अपडेट आले आहे.रोहित आणि विराटने पाठोपाठ निवृत्ती घेतल्यानंतर, अशा अफवा पसरल्या की बीसीसीआय म्हणजेच भारतीय क्रिकेट नियामक मंडळ यामागे असू शकते. परंतु, आता दोन्ही स्टार खेळाडूंच्या निवृत्तीबद्दल बीसीसीआयकडून पहिली प्रतिक्रिया आली आहे. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी सांगितले आहे की कोणालाही निवृत्ती घेण्यास भाग पाडले गेले नाही.बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला यांनी एएनआयशी बोलताना म्हटले आहे की, ङ्खमी हे पूर्णपणे स्पष्ट करू इच्छितो. आपण सर्वजण रोहित शर्मा आणि विराट कोहलीची आठवण काढत आहोत. निवृत्तीचा निर्णय रोहित शर्मा आणि विराट कोहली यांनी स्वतःच्या इच्छेने घेतला होता. बीसीसीआयचे धोरण आहे की आपण कधीही कोणत्याही खेळाडूला निवृत्ती घेण्यास सांगत नाही. हा त्याचा स्वतःचा निर्णय होता. त्याने स्वतःच्या मर्जीने निवृत्ती घेतली आहे. आम्ही त्याला नेहमीच एक उत्तम फलंदाज मानू. हे दोघेही एकदिवसीय सामन्यांसाठी उपलब्ध आहेत ही आमच्यासाठी खूप चांगली गोष्ट आहे.ङ्खङ्खविराट कोहलीने २०११ मध्ये कसोटी पदार्पण केले. तेव्हापासून, त्याने त्याच्या शेवटच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यापर्यंत १२३ कसोटी खेळल्या आणि ४६.९ च्या सरासरीने ९२३० धावा केल्या. आपण कसोटीत कोहलीच्या बॅटमधून ३० शतके आणि ३१ अर्धशतके पाहिली आहेत. रोहित शर्माने २०१३ मध्ये कसोटी पदार्पण केले.

# बुलढाण्यात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा; ३३ उमेदवारांची प्राथमिक तर १६ उमेदवारांची अंतिम निवड

**जनसंचलन/बुलडाणा**

जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्याने रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यामध्ये १५५ उमेदवारांनी नोंदणी करुन ६६ उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखत दिल्या. त्यापैकी ३३ उमेदवारांची प्राथमिक तर १६ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. तसेच उमेदवारांसाठी कौशल्य ज्ञान, सामान्य चाचणी परीक्षा, रोजगार व स्वयंरोजगार संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर बुलढाणा आणि स्किल पॅरामेडिकल कॉलेज, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमानाने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी विष्णू बचाटे, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त गणेश बिटोडे, जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड, जिल्हा उद्योग केंद्र व्यवस्थापक सुनील पाटील, कार्यक्रमाचे आयोजक स्किल पॅरामेडिकल बुलढाणाचे अध्यक्ष सचिन सुपे, कौशल्य विकास अधिकारी संजीवनी नाईकवाडे, श्रीपाद परळीकर व प्राचार्या श्रीमती पाटील आदी उपस्थित होते.

रोजगार मेळाव्यापूर्वी उमेदवारांसाठी कौशल्य ज्ञान सामान्य चाचणी परीक्षा, रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन शिबिर कार्यक्रमांचा समावेश होता. कौशल्य ज्ञान सामान्य चाचणी परीक्षांमध्ये भाग घेणाऱ्या पैकी प्रथम तीन येणाऱ्या उमेदवारांना कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे यांच्या हस्ते पारितोषिक तसेच प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व उमेदवारांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. या रोजगार मेळाव्यात सिद्ध ह्युंडाई बुलढाणा, खानदेश मोटर्स बुलढाणा, जिजामाता महाविद्यालय बुलढाणा, श्री शिवाजी महाविद्यालय चिखली या आस्थापनांच्या प्रतिनिधींनी उपस्थित उमेदवारांच्या मुलाखती घेऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. यावेळी १५५ उमेदवारांनी रोजगार मेळाव्यासाठी नोंदणी केली तर ६६ उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखत दिल्या. त्यापैकी ३३ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून १६ उमेदवारांची अंतिम निवड करण्यात आली. जागतिक युवा कौशल्य दिनाच्या दिवशी ङ्कमी माझा कौशल्य विकास करणारच असा संकल्प करा, असे आवाहन महाव्यवस्थापक प्रमोद लांडे यांनी केले. कौशल्य शिवाय पर्याय नाही त्यामुळे



कौशल्य गुणांना वाव देऊन व्यवसाय सुरू करा, असे मत विष्णू बचाटे यांनी मांडले. जिल्हा उद्योग केंद्र मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती सुनील पाटील यांनी उपस्थितांना दिली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सहायक आयुक्त गणेश बिटोडे यांनी केले. यावेळी कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती त्यांनी प्रास्ताविकातून दिली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन स्किल पॅरामेडिकलचे अध्यक्ष सचिन सुपे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बुलढाणा तसेच स्किल पॅरामेडिकल कॉलेज, बुलढाणाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | - |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | - |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे

पुन्हा एकदा...
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना



गुंतवणूकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षापर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४


## उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४ १९ जुलैपर्यंत प्रवेशिकांना मुदतवाढ

**जनसंचलन/बुलडाणा**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रण, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियान जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत. पुरस्कारासाठी १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रसिद्ध झाले लेखन, छायाचित्रे आणि वृत्तकथांच्या प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. प्रवेशिका सादर करण्याची अंतिम मुदत आता १९ जुलै २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. राज्य शासनामार्फत एकूण २० पुरस्कार प्रदान केले जातील. यात १ राष्ट्रीय स्तरावरील, ११ राज्य स्तरावरील आणि ८ विभागीय स्तरावरील पुरस्कारांचा समावेश आहे. या पुरस्कारासाठी अर्जाचे नमुने आणि माहितीपत्रक माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या https://dgipr.maharashtra.gov.in/awards या संकेतस्थळांवर उपलब्ध आहेत. पात्र इच्छुकांनी जिल्हा माहिती कार्यालय, प्रशासकीय इमारत, बुलढाणा येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करावेत. इच्छुकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या प्रवेशिका निर्धारित मुदतीत सादर कराव्यात, असे आवाहन प्र. जिल्हा माहिती अधिकारी पवन राठोड यांनी केले आहे.


पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***




दैनिक निडर निर्भिड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001

# अंढेरा पोलीसांचे अवैध दारू विक्रीवर दुर्लक्ष!

## एलसीबीने कारवाई करून ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल केला जप्त!

**जनसंचलन/ अंढेरा**

ग्रामीण भागात अवैध देशी दारू धडाक्यात विकल्या जात असून एलसीबीच्या पथकाने अंढेरा पोलीस ठाणे अंतर्गत ग्राम दिग्रस व सरंबा फाटा येथे २ आरोपींवर १४ जुलैला कारवाई करत ८ हजार ९६० रुपये किमतीच्या दारूसह एक मोटार सायकल असा एकुण ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्यामुळे अंढेरा पोलीसांचे अवैध दारू विक्रीवर दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. ग्रामीण भागात अवैध देशी दारू विक्री धडाक्यात सुरू आहे.मूळ किमतीपेक्षा दुप्पट भावात ही दारू विकून अवैध दारू विक्रेते मालामाल होत आहेत. दारूची व्यसनाधीनता वाढली असून गोरगरीबांच्या संसाराची राख रांगोळी होत आहे.यातूनच गुन्हेगारीला वाट मोकळी होत असून,प्रसंगी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न देखील निर्माण होतोय. मात्र अंढेरा पोलीस ठाणे हद्दीत असे अवैध धंदे सुरू असून, या धंद्यांना अंढेरा पोलीसांचा आर्शिवाद असल्याचे दिसून येत आहे.मात्र जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी अवैध धंद्यांवर आसूड ओढत कारवाईचा धडाका लावला आहे.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुनील अंबुलकर यांच्या नेतृत्वाखालील पथक कार्यवाहीसाठी सक्रिय झाले आहे. अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या ग्राम दिग्रस व सरंबा फाटा येथे २ आरोपींवर १४ जुलैला कारवाई करत ८ हजार ९६० रुपये किमतीच्या दारूसह एक मोटार सायकल असा एकुण ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कारवाई करण्यात आली. या कारवाईत देशी दारू सखू संत्रा १८० एमएलच्या ६४ बॉटल तर ९० एमएलच्या १०० बॉटल अशी एकूण ८ हजार ९६० रुपयांच्या दारूसह एक मोटरसायकल असा एकुण ५८ हजार ९६० रुपयांचा मुद्देमाल जप्तीची कार्यवाही एपीआय संजय मातोंडकर, एएसआय ओम प्रकाश सावळे, वनिता शिंगणे, मंगेश सनगाळे, दीपक वायाळ या पथकाने केली आहे.

# निवडणुका न घेता प्रशासकीय अधिकाऱ्यांनाच जनसेवक ही पदवी बहाल करा!


**जनसंचलन/ बुलढाणा**

नगर परिषदेमध्ये चार ते पावणे पाच वर्षापासून निवडणूक झालेली नसताना आणि एकही सदस्य किंवा पदाधिकारी कार्यरत नसताना, प्रशासकीय अधिकारी नागरिकांची कामे चांगली करत असल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कायमस्वरूपी प्रशासकीय अधिकारी ठेवावे व सदस्य हे पद रद्द करण्यात यावे, अशी मागणी जनसामान्य माणूस अन्याय अत्याचार कृती समितीने जिल्हाधिकारी यांना केली आहे. बुलढाणा शहरात गेल्या चार ते पावणे पाच वर्षापासून नगर परिषदेच्या निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे सदस्य किंवा पदाधिकारी कार्यरत नाहीत.नगर परिषदेचे कार्य हे प्रशासकीय अधिकारीच पार पाडत आहेत. जनतेची कामे देखील चांगल्या रीतीने पार पाडली जात असून, कोणत्याही घटकाला मूलभूत गरजांपासून वंचित ठेवल्या जात नाही.त्यामुळे कोणताही सदस्य नसताना एवढी चांगली कामे होत असेल तर सदस्य कशाला हवेत? असा प्रश्न निवेदनात उपस्थित करण्यात आला आहे. नगरपरिषदेत कोणतेही नागरिकाची समस्या किंवा तक्रार आली तर अवघ्या पाच मिनिटात समस्यांचे निराकरण होते. तर कशाला सदस्य पाहिजे ? त्यामुळे निवडणुका न घेता प्रशासकीय अधिकाऱ्यांनाच जनसेवक ही पदवी बहाल करावी आणि निवडणुकीवर होणारा हजारो कोटींचा खर्च शासनाने वाचवावा,अशी मागणी जनसामान्य माणूस अन्याय अत्याचार कृती समिती बुलढाणाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून आज १५ जुलै रोजी केली आहे.

# लम्पीने ४ गाई २ वासरू दगावले!

## पशुवैद्यकीय दवाखाना बंद, डॉक्टर बेपत्ता!

**जनसंचलन/ जानेफळ**



देऊळगाव साखरशा परिसरात लम्पी हा आजार बळावला असून, पशुवैद्यकीय यांच्या दुर्लक्षामुळे एका पशुपालकाच्या चार गाई व दोन वासरू दगावल्याची घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे चार दिवसापासून उंबरठा झिजवणाऱ्या पशुपालकांना दवाखाना बंद दिसला तर डॉक्टर गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. देऊळगाव साखरशा शिवारात शेतकऱ्यांसाठी चिंतेत टाकणारी ही घटना आहे. पशुपालक आपले गुरे शेतात राबवत असले तरी, त्यांना जीवापाड जपतात.त्यांना कुठल्याही आजाराची लक्षणे आढळल्यावर पशुवैद्यकीय दवाखाना गाठतात. त्यांच्यावर वेळीच उपचार व्हावे यासाठी पशुपालकांना चिंता लागून असते.मात्र पशु वैद्यकीय दवाखाना बंद असला किंवा उघडा असून डॉक्टर गैरहजर असले तर,पाळीव जनावरे उपचारा अभावी पाय खोरत मृत्युमुखी पडतात.सध्या लम्पी आजाराची लागण होऊन अनेक गुरेढोरे दगावत असल्याची घटना देऊळगाव साखरशा येथे घडत आहे. देऊळगाव साखरशा येथील दिलीप बळीराम राठोड यांचे लम्पी आजारामुळे चार गाई व दोन वासरू दगावले असून पशुवैद्यकीय अधिकारी हे मात्र गैरहजर होते. पशुवैद्यकीय दवाखाना बंद स्थितीत आहे,असा आरोप पशुपालकांनी केला आहे. दिलीप राठोड यांनी पाच वेळेस दवाखान्यांमध्ये जाऊन सुद्धा पशुवैद्यकीय अधिकारी न मिळाल्याने त्यांची जनावरे दगावली आहे. तरी प्रशासनांनी यांची दखल घेऊन लम्पी आजारापासून जनावरे वाचवावीत, देऊळगाव साखरशा येथील पशुवैद्यकीय डॉक्टरांना समज देऊन दवाखाना नियमित सुरू ठेवण्याचे निर्देश देण्यात यावे, अशी मागणी पशुपालकांनी केली आहे.

# मागासवर्गीय बौद्ध सफाई कामगारांना निवासी साठी जागा मिळण्याबाबत

## बुलढाणा नगरपालिका बहुजन कर्मचारी संघटनेतर्फे प्रशासनाला निवेदन...



**वृत्तसंस्था/बुलढाणा**

बुलढाणा नगरपालिका बहुजन कर्मचारी संघटनेतर्फे प्रशासनाला बुलढाणा नगरपालिका मधील मागासवर्गीय बौद्ध सफाई कामगारांना राहण्यासाठी जागा देण्यात यावी या मागणी करता आज दि १५ जुलै रोजी निवेदन देण्यात आले आहे.

यामध्ये बुलढाणा नगरपरिषद चे वाल्मिकी मेहतर सफाई कामगारांना न. प कार्यालयाच्या मागील बाजूस राहण्यासाठी जागा दिली आहे तसेच मुस्लिम मेहतर सफाई कामगारांना हिंदू स्मशानभूमी जवळ बांधण्यात आलेले घरकुल योजनेतील इमारतीमध्ये घर देण्यात आले आहे त्याचप्रमाणे उर्वरित बौद्ध व नवबौद्ध समाज सफाई कामगारांना यांची सेवा पंचवीस वर्षे झाली असूनही आतापर्यंत त्यांना कुठल्याही शासनाच्या योजनेमध्ये समाविष्ट केले नाही व लाभापासून वंचित ठेवत आहे तरी आजही त्यांच्यावर अन्याय होत आहे. या अगोदर सुद्धा वारंवार तक्रारी करण्यात आली आहे मात्र कुठलीही दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे येत्या पंधरा दिवसात निवासी प्रयोजन साठी खाली भूखंड उपलब्ध करून न मिळाल्यास आम्ही बहुजन कर्मचारी संघटनेच्या वतीने आपल्या कार्यालया समक्ष १३ ऑगस्ट २०२५ पासून काम बंद उपोषण सुरू करणार आहे त्याची दखल प्रशासनाने घ्यावी असा इशारा बुलढाणा नगरपालिका बहुजन कर्मचारी संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे. बुलढाणा नगरपालिका बहुजन कर्मचारी संघटनाचे जिल्हाध्यक्ष विजय राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.या वेळी निवेदन देताना जिल्हाध्यक्ष विजय राऊत,सचिव दिलीप राजभोज,मुकुंदा आराख, संघटक बाला राऊत, विजय आराख,सावंत डोंगरदिवे आदी लोक उपस्थितीत होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====

संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८